## CHALLAN
### MTR Form Number-6

| GRN | MH018743803202526U | BARCODE | | Date | 10/03/2026-23:00:03 | Form ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Department** | District And Sessions Court | | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Judicial Stamps<br>Court Fees Collected in Stamps IGR | | **TAX ID (Case No.)** | 277-2026 |
| | | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | CHIEF JUDICIAL MAGISTRATE WARDHA | | **Full Name** | Adv. R.V. Hiware |
| **Location** | WARDHA | | | |
| **Year** | 2025-2026 From 01/04/2025 To 31/03/2026 | | **Flat/Block No.** | |
| **Account Head Details** | | **Amount In Rs.** | **Premises/Building** | |
| 0030034801 | Court Fees Stamps | 5.00 | **Road/Street** | Wardha |
| | | | **Area/Locality** | Wardha |
| | | | **Town/City/District** | |
| | | | PIN | |
| | | | **Remarks (Party Details)** | |
| | | | Sai shradha Deoli VS. Manish Bhoyar | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | **Amount In Words** | Five Rupees Only |
| **Total** | | 5.00 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Payment Details** | STATE BANK OF INDIA | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 00040572026031028772 | CPAGLLHRX4 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 10/03/2026-23:24:01 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | STATE BANK OF INDIA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID :

Mobile No. : XXXXXX1766



Print Date 10-03-2026 11:01:01

Exh.No.6

**कोर्ट विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, कोर्ट नं. 2 वर्धा.**

फौ.समरी.कम्प्लेंट क्रं. 277/2026 पे. ता. 11/03/2026

**साईश्रद्धा देवळी अर्बन सहकारी पतसंस्था मर्या.देवळी**

**- विरुद्ध –**

**मनिष भोयर**

**फिर्यादी तर्फे साक्षदार क्रं 1 ची शपथेवर पडताळणी (फिर्यादी स्वत:)**

मी देवाची शपथ घेऊन प्रतीज्ञा पुर्वक खरे सांगते की,

o

---------------------------

R & R
Sd/-
2nd Jt. JMFC, Wardha

माझे नाव :- श्री. उमेश कृष्णराव डफरे

वय :- 35 वर्षे, कामधंदा – नौकरी – व्यवस्थापक.

राहणार :- नांदोरा (डफरे), तह.- देवळी, जि. – वर्धा

**सरतपासणी :- ॲड. रश्मी व्ही. हिवरे, अधिवक्ता फिर्यादी तर्फे**

1. मी साईश्रद्धा देवळी अर्बन सहकारी पतसंस्था मर्या, देवळी या संस्थेत व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहे. फिर्यादी संस्थेचा नोंदणी क्रमांक - 498/2003 असा आहे. मला फिर्यादी संस्थेने कोर्टात केसेस दाखल करणे व त्यामध्ये साक्ष पुरावे देण्याचे अधिकार दिलेले आहेत. फिर्यादी संस्था यांनी मला नियुक्ती बाबत पारित केलेल्या ठरावाची प्रत मूळ प्रती वरून पडताळणी करून साक्षांकीत केलेली छायांकित प्रत मी दावे तक्रारी सोबत दाखल केली असून त्यातील मजकूर माझ्या

व्यवस्थापक,
साईश्रद्धा देवळी अर्बन सहकारी पत संस्था, देवळी
V.K.Dafare

२ रे सह.दिवाणी न्यायाधिश क.स्तर वर्धा

माहिती प्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर फिर्यादी संस्थेच्या अध्यक्षांची सही आहे. मी मूळ प्रत आज रोजी सोबत आणली असून त्याचे अवलोकन करण्याची माझी विद्यमान न्यायालयास नम्र विनंती असून मी दाखल केलेल्या प्रतिस पडताळणी करून त्यास निशाणी क्रमांक ............ देण्यात यावा.

2. मी सदर प्रकरणातील आरोपी ह्यांना ओळखतो तो फिर्यादी संस्थेचा खातेदार आहे. आरोपी ह्यांनी आमच्या फिर्यादी संस्थेकडे दिनांक 30/08/2021 रोजी रुपये 1,14,000/-( एक लाख चौदा हजार रुपये फक्त) कर्ज वाहन खरेदी करण्याकरिता कर्ज मागणीचा अर्ज केला होता. फिर्यादी संस्थेने आरोपी ह्यांचा कर्ज मागणी अर्ज फिर्यादी संस्था संचालक मंडळाचे दिनाक 16/09/2017 रोजी झालेल्या बैठकीतील मंजूर ठराव क्रमांक 6 नुसार मंजुर करून आरोपी ह्यांचे रुपये 1,14,000/- चे कर्ज मंजुर केले. आरोपी वाहन कर्ज खाते क्रमांक – VL -163 असा आहे. त्यानंतर आरोपी ह्यांनी कर्ज रक्कम रुपये 1,14,000/- ची उचल केली. कर्ज रक्कम उचलते वेळेस आरोपी ह्यांना कर्ज रक्कम परतफेडी बाबत चे सर्वच नियम समजावून सांगितले होते व ते सर्व नियम व शर्ती आरोपी ह्यांना मान्य होते. आरोपी ह्यांनी सदर कर्ज रक्कम 24 महीने ( 2 वर्षे ) चे मुदतीत मासिक हप्ता रुपये 5,527/- या प्रमाणे व्याजदर 15% वार्षिक दराने परतफेड करण्याचे मान्य करून कर्ज रक्कम उचल पावती व प्रामिसरी नोट (वचन चिठ्ठी) आणि करारपत्रक फिर्यादी संस्थेस आरोपी ह्यांनी करून दिलेले आहे. कर्ज रक्कम परतफेडी बाबत सर्व अटी

व्यवस्थापक,
साई श्रद्धा देवळी ... सहकारी
पत संस्था, देवळी.
V.K. Dafare

व शर्ती आरोपी ह्यांना मान्य होत्या. त्याप्रमाणे आरोपी ह्यांनी कर्जाची परतफेड केलेली नाही.

3. त्यानंतर आरोपी ह्यांना फिर्यादी संस्थेने बरेचदा थकीत कर्ज रक्कम भरणे कामी फोन करून आणि नोटिस पाठवुन वांरवांर विनंती केली असता, आरोपी ह्यांनी स्वतःचे जबाबदारीच्या पूर्तते करिता रक्कम रुपये 36,758/- चा धनादेश, धनादेश क्रमांक 000001 फिर्यादी संस्थेस दिला. आरोपी ह्यांनी घेतलेल्या वाहन कर्ज रक्कमेच्या परतफेडी करिता दिनाक 18/11/2025 रोजी एच. डी. एफ. सी. बँक, शाखा –वर्धा, तह. – जिल्हा – वर्धा चा धनादेश, धनादेश क्रमांक – 000001 रक्कम रुपये 36,758/- चा दिला. सदर धनादेशावर आरोपी ह्यांची सही आहे. सदर धनादेशाची मुळ प्रत मी अभिलेखावर दाखल केली असून त्यावर आरोपी ह्यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, सबब त्यास निशाणी क्रमांक ............... देण्यात यावा. सदर धनादेश वटविण्या करिता फिर्यादी संस्थेने त्यांचे खाते असलेल्या बँक ऑफ बडोदा, शाखा – देवळी तह. – देवळी, जिल्हा - वर्धा येथे दिनाक 19/11/2025 रोजी जमा करून सादर केला असता, सदर धनादेश दिंनाक 19/11/2025 रोजी न वटविता आरोपीचे खात्यात पुरेसे पैसे नसल्याने "अपर्याप्त निधि" **(Insufficient Funds)** या कारणास्तव न वटविता दिंनाक 19/11/2025 रोजी परत आला. मी धनादेश परत आल्याबाबत चे धनादेश परतीचे पत्र (चेक रिटर्न मेमो ) अभिलेखावर दाखल केली असून त्यातील मजकुर खरा व

व्यवस्थापक,
V.K. Dafare

बरोबर आहे. त्यावर संबंधित बँक अधिकाऱ्याची सही आहे. तरी त्यास निशाणी क्रमांक............, ........ देण्यात यावा.

4. त्यानंतर (फिर्यादी संस्थेने) मी आरोपीस अधिवक्ता मार्फत नोंदणीकृत डाकेने पोच पावती सह धनादेश रक्कम मागणी करिता दिंनाक 12/12/2025 रोजी कायदेशीर नोटिस पाठविला होता. सदर नोटिसवर माझी व माझे वकिलांची सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटिसची स्थळप्रत मी अभिलेखावर दाखल केली असून त्यास निशाणी क्रमांक ......... देण्यात यावा. तसेच मी सदर नोटिस पोस्ट केल्या बाबतची पोस्टाची पावती मूळ प्रत व सदर नोटिस आरोपी ह्यांना दिंनाक 13/12/2025 रोजी मिळाला त्याबाबतची मला आलेली पोच पोचपावती. सदर दस्तऐवज मी अभिलेखावर अनुक्रमे दाखल केले असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे तरी त्यास अनुक्रमे निशाणी क्रमांक ......., ........, ................ देण्यात यावे. यावरून आरोपी ह्यांचे सदर कृत्य हे बँक / पतसंस्थेकडून घेतलेले कर्ज रक्कम परत न करण्याच्या हेतूने आरोपी ह्यांनी सदर धनादेश आरोपी ह्यांचे खात्यात पुरेशी निधी नसल्याची पूर्ण जाणीव आरोपी ह्यांना असून देखील फिर्यादी संस्थेची फसवणूक करण्याच्या हेतूने दिलेला असून आरोपी ह्यांनी निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट नुसार गुन्हा केला असून आरोपी शिक्षेस व दंडास पात्र झाला आहे. सबब सदर प्रकरण आरोपी विरुद्ध फिर्यादी संस्थेस दाखल करणे अनिवार्य झाले असून सदर प्रकरण हे कालमर्यादित दाखल केले आहे. तरी फिर्यादी संस्थेला आरोपी

व्यवस्थापक,
साईबाबा देवळी बर्धन सहकारी
पत संस्था, देवळी.
V. K. Dafare

ह्यांचे कडून कर्ज रक्कमे करिता दिलेल्या धनादेशाची रक्कम व्याजासह व सदर प्रकरणाच्या खर्चासह मिळण्यात येवून कायदेशीर तरतुदींनुसार आरोपी ह्यांना दंड रक्कमेसह शिक्षा देण्यात यावी.

वर्धा :

दिनाक : 11/03/2026

शपथपत्र करणार

व्यवस्थापक,
साई श्रद्धा देवळी बर्धन सहकारी
पत संस्था, देवळी.
U.K. Dafare

## सत्यापन

मी नामे उमेश कृष्णराव डफरे, वय : 35 वर्षे, व्यवसाय :- नौकरी – (व्यवस्थापक), राहणार :- नांदोरा (डफरे), तह.-देवळी , जि. वर्धा., सत्यापित करतो की, वरील पडताळणी /पुरावा शपथ पत्रातील परीच्छेदा मध्ये लिहिलेला संपूर्ण मजकूर हा माझ्या माहिती व सांगण्यानुसार लिहिलेला असून संपूर्ण सत्य व बरोबर लिहिलेला आहे.व तो मी वाचुन व समजून घेऊन आज दिनाक 06/03/2026 रोजी वर्धा मुक्कामी सत्यापन लेखावर सही केली आहे.

सत्यापन करणार

U.K. Dafare

मी सत्यापन करणार ह्यांना ओळखतो,त्यांनी

माझे समक्ष यावर सही केली आहे.

Hiware

( ॲड. रश्मी व्ही. हिवरे, वर्धा )

Solemnly affirmation before me
on this 6th day of March Date 2026
by me Umesh Krushnarao Dafare age 35
who is certified before me by R/o Nandora Dafre
Shri R. V. Hiware Adv. whom Ta Deoli Dist Wardha
personaly know.

Jt.C.J.J.D. & J.M.F.C
Wardha
6/3/2026

Sr. Clerk
Wardha

व्यवस्थापक,
साई श्रद्धा देवळी बर्धन सहकारी
पत संस्था, देवळी